The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
==================================================================
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
------------------------------------------------------------------
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024
==================================================================

# संत साहित्यातील विश्वात्मकता

प्रा.डॉ. टापरे अ.द.
सहा. प्राध्यापक मराठी, तोष्णीवाल महाविद्यालय, सेनगाव

'जो जेवांशील तोते लाहो' हे पसायदान मागतानाची विश्वात्मक जाणीव हे संत साहित्याचे तत्त्वज्ञान होय. भारतीय परंपरेतील संत परंपरेतील एक प्रवाह विश्वास्म कथेच्या संदर्भाने बघत असताना आपल्याला अनेक वर्षांपूर्वीच्या कालखंडाचा विचार करणे गरजेचे आहे आणि त्याही पुढे जाऊन आज आपल्याला या विचारांची गरज का भासते आहे याचाही विचार करावा लागणार आहे. मराठी साहित्यातील एक महत्त्वपूर्ण प्रवाह म्हणजे संत साहित्य होय. अध्यात्मिक तत्त्व चिंतनाच्या माध्यमातून समाजातील मूल्यांची रुजवणूक करण्याचा प्रयत्न संतांच्या माध्यमातून झालेला आपण दिसतो. अध्यात्मिकतेच्या तत्त्व चिंतनातून अभंग, ओवी, चारित्र्य इत्यादी माध्यमातून समाजातील चांगल्या वाईट गोष्टींचा परामर्श घेऊन वेळप्रसंगी सामाजिक परिस्थिती आपल्या अभिव्यक्तीच्या माध्यमातून टिकविण्याचे कार्य संतांनी केले. सरळ, सोप्या, संस्कारित भावनेने लोक भाषेचा वापर करून समाजात जागृतीचे एक त्याचे कार्य संतांनी केले म्हणजेच सर्व संत साहित्य हे वाङ्मयाला लाभलेली वरदान आहे. ज्यामध्ये विश्वात्मक जाणिवेचा प्रभाव झालेला दिसतो आजही आहे आणि उद्याही राहणार हे सत्य आहे. महाराष्ट्राला संत साहित्याची फार मोठी परंपरा लाभली आहे .संतांनो समाजाच्या कल्याणासाठी कार्य केले अध्यात्मिकतेच्या माध्यमातून लोकांना विश्वशांतीचा संदेश देण्याचे कार्य संतांनी केले.

महाराष्ट्राची ओळख ही संतांची वीरांची भूमी म्हणून ओळखली जाते महाराष्ट्राच्या भूमीला लाभलेल्या वारसास म्हणजे संत साहित्य होय. संतांनी मध्ययुगीन कालखंडात भक्ती मार्गाचा अवलंब केला. भक्तिमार्गाची स्थापना केली आणि एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. महाराष्ट्राच्या नव्या युगात समाज जीवनातील विविध स्तरातून संत एकत्र आले. भागवत धर्माची स्थापना झाली आणि त्यांच्या आचारात आणि विचारात विठ्ठल भक्तीला केंद्रस्थानी ठेवून अनेक गोष्टी घडत होत्या.

संतांनी मानवी मूल्यांचा स्वीकार केला समाजवादाची उभारणी केली. नव मानवतावादाची मूल्य मांडली, उपेक्षितांच्या वेदना मांडल्या, समाजातील दांभिकतेवर ताशेरे ओढले, तेराव्या शतकात असणारे समाजजीवन हे मूलतः विषमतेवर आधारित आहे आणि विषमतेतून निर्माण होणारे अनेक प्रश्न समाजात होते. त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी अध्यात्माच्या मार्गातून संस्कृत भाषा कर्मकांडे आणि पुरोहित्य वर्गाचे वर्चस्व यांच्या विरोधात बंडखोरी करून नामसंकीर्तनाच्या माध्यमातून लोकांनी भक्ती मुक्तीचा मार्ग सांगितला. ओवी, अभंग, पदे, भारुडे या रचना करून तळागाळातील समूहांच्या मनातील आत्मविश्वास जागा करण्याचे काम संतांनी केले आणि या सर्व कार्याचा संबंध हा विश्वासूमकतेची जोडलेला जातो. जात-पात वर्ग वर्ण अशा सर्वच गोष्टी या वेगवेगळ्या स्वरूपात सगळ्या ठिकाणी अस्तित्वात आहेत. म्हणून भक्ती मार्ग हा स्वतंत्रपणे आपली कार्य वैश्विक स्तरावर करतो आहे.

'जो जेवांशील तोते लाहो प्राणी जात'

हे ज्ञानेश्वरांचे पसायदान सर्वत्र वैश्विक जाणवेने प्रेरित आहे. त्याचप्रमाणे संत नामदेव म्हणतात 'ज्ञानदीप लावू जगी' ही भूमिका ही समाजात सर्व स्तरात ज्ञानाच्या संक्रमणाची भावना रुजविण्याचे कार्य करते. संतपरंपरेतील प्रत्येक संताचे योगदान हे भक्तिमार्गाचे निरनिराळ्या वेदना, विद्रोह, लोकोदधार, मूल्य अशा एक विश्वात्मक जाणीव संतांनी आपल्या जीवनात अंगीकारल्या समाजात रुजविल्या आणि खऱ्या अर्थाने त्यांनी केलेली कार्य हे काल आज आणि उद्याही अत्यंत महत्त्वाचे आहे.

श्री ज्ञानदेवांनी वारकरी संप्रदायाचा पाया घातला तर नामदेवांनी त्याचा विस्तार केला. एकनाथांनी भक्कम आधार दिला आणि तुकाराम महाराज या वारकरी संप्रदायाच्या भागवत धर्माच्या वारकरी संप्रदायाचा भागवत धर्माच्या मंदिराचा कळस झाले. अत्यंत रुपात्मक पद्धतीने वहीवलेली आपण आपल्या शब्दात अभंगारचना केली.

संत कृपा झाली इमारत फळा आली
ज्ञानदेवे रचिला पाया उभारिले देवालया
नामा तयाचा कम करा तेने केला हा विस्तारा
जनार्दन एकनाथ खांब दिला भागवत
तुका झालासे कळस भजन करा सावका

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात संत साहित्याची आवश्यकता म्हणण्यापेक्षा येतात म्हणण्यास हरकत नाही. कारण भौतिक सुख सुविधांच्या काळात माणूस आणि माणुसकी यापासून समाज दूर जाताना दिसतो आहे. मानवी मुलांची गरज समाज समाजात अनिवार्य आहे. संतांनी या मानवी मूल्यांची रुजवणूक केली आहे. सध्याच्या काळात माणसामधील प्रेम आपुलकी बंधुभाव दया या गोष्टीकडे दुर्लक्ष होत आहे. माणसांमध्ये असहिष्णुता वाढीस लागली आहे. या सर्व बाबींचा विचार करता वैश्विक स्तरावर संत साहित्य खूप मोठा योगदान देत आहे आणि त्याची आवश्यकता नव्हे अनिवार्यताच असावी असे मला वाटते.

**निष्कर्ष**

1.महाराष्ट्राला संत साहित्याची खूप मोठी परंपरा आहे.
2.संत साहित्य विश्वात्मक जाणीव याचे प्रेरित आहे.
3.संत साहित्यात समाज माध्यमे मूल्यांची रुजवणूक करण्याचे सामर्थ्य आहे
4.आजच्या आधुनिक काळात संत साहित्याचे महत्त्व समाजातील संतुलन राखण्यासाठी गरजेचे आहे.
5.अध्यात्माच्या लोकभाषेच्या लोकजाणीवेच्या जातीपातीची बंधन जुगारून एकात्मतेच्या जोरावर संत साहित्य उभे आहे.
6.विश्वशांतीचा संदेश देण्याचे कार्य संत साहित्य करते.
7.समता बंधुता एकतेचा संदेश देण्याचे कार्य संत साहित्य करते.
8.अठरापगड जातींचा एक धर्म होतो हा विचार रुजविण्याचे कार्य केवळ संत साहित्यच करू शकते
9.विश्व कल्याणाची भावना निर्माण करण्याचे सामर्थ्य संत साहित्यात आहे.

**संदर्भ**

1. संतसाहित्यशोधआणिबोधडॉक्टरयुगपठाणदिलीपराज प्रकाशन पुणे